अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा.क्र:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/५८६०
दिनांक :- २६।११।२०२०

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत वयोपरत्वे सेवानिवृत्त करणेबाबत

संदर्भ :- नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. पीएमसी.३०१४/प्र.क्र.०२/नवि-२२ दि.२६/०८/२०१४

पुणे महानगरपालिकेचे विविध खात्यांकडील वर्ग १ ते ३ मधील अधिकारी व सेवकांना वयाच्या ५८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व वर्ग - ४ मधील सेवकांना वयाच्या ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुणे महानगरपालिका सेवेतून वयोपरत्वे सेवानिवृत्त करण्यात येते.

" पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ " मे. राज्य शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर सेवाप्रवेशनियमान्वये पुणे महानगरपालिकेकडील विविध पदांची नावे, सेवा, श्रेणी (वर्ग), शैक्षणिक अर्हता इ. बाबी मे. शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील सेवाप्रवेश मंजूर होण्यापूर्वी वर्ग - ४ मध्ये असलेली पदे सदर शासन निर्णयामध्ये वर्ग - ३ मध्ये समायोजित केलेली आहेत.

सर्व खातेप्रमुख यांनी " पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४" मध्ये पदांची श्रेणी/वर्गामध्ये झालेल्या बदलांचे अनुषंगाने कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये, वेतन संगणक प्रणालीमध्ये आवश्यक बदल म्हणजेच वयोपरत्वे सेवानिवृत्त करावयाचा दिनांक सुधारित करणेबाबत कार्यवाही १ महिनेच्या आत त्वरित पूर्ण करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत आमचेकडे सादर करावा.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही न केल्याने भविष्यात कोणतीही प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास अथवा पुणे महानगरपालिकेस काही तोशिष लागल्यास किंवा सेवानिवृत्तीची दिनांक चुकल्यास संबंधित सर्व खातेप्रमुख यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई आणि आर्थिक नुकसानीची वसुली प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

Rubal 25/11/2020
(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहिती व पुढील तजवीजीसाठी रवाना...